# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा,
मुंबई - ४०० ००५. दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/ २२१६ ३९६५ ई-मेल:
mercindia@merc.gov.in संकेत स्थळ: www.merc.gov.in

जाहिरात क्रमांक.:३४/२०२४

## जाहीर सूचना

**मे . एसईझेड बायो-टेक सर्व्हिसेस प्रा .लि. च्या मांजरी एसईझेड आणि हडपसर एसईझेडला लागू असलेल्या प्रारूप वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी विनियमांवर अभिप्राय मागविण्याबाबत**

१) आयोगाने सन २०२३ च्या प्रकरण क्रमांक १७९ आणि १८० मध्ये दिनांक ८ डिसेंबर २०२३ रोजी दिलेल्या आपल्या सामायिक आदेशान्वये विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १४ अंतर्गत खालील अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रासाठी मे. एसईझेड बायो -टेक सर्व्हिसेस प्रा. लि. च्या मानीव वितरण परवानाधारकाच्या दर्जास पुष्टी दिली आहे.

एक) जैव तंत्रज्ञानासाठी मांजरी बुद्रुक तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील २२.४२२६ हेक्टरचे क्षेत्र- सापेक्ष विशेष आर्थिक क्षेत्र( एसईझेड )

दोन) जैवतंत्रज्ञान आणि औषध विज्ञानासाठी हडपसर/ मांजरी गाव, पुणे येथील १२.४१३६ हेक्टर चे क्षेत्र - सापेक्ष विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड)

२ ) विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १६ अंतर्गत आयोगाला परवानाधारकांना लागू असलेल्या सर्वसाधारण किंवा विशिष्ट अटी विनिर्दिष्ट करता येतील आणि या अटी त्याच्या परवान्याच्या अटी मानण्यात येतील. त्यानुसार आयोगाने उपरोक्त आदेशात सदर अधिसूचित एसइझेडसाठी लागू असलेल्या परवान्याच्या विशिष्ट अटी विनिर्दिष्ट करून स्वतंत्रपणे विनियम अधिसूचित करण्यात येतील असे नमूद केले आहे .

३) आयोगाने प्रारूप मविनीआ (मे. एसईझेड बायो - टेकच्या मांजरी गाव, जिल्हा पुणे येथील पुनावाला बायोटेक्नॉलॉजी पार्कसाठी क्षेत्र-सापेक्ष विशेष आर्थिक क्षेत्राकरिता लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०२४ आणि प्रारूप मविनीआ (मे .एसईझेड बायो-टेकच्या हडपसर गाव, जिल्हा पुणे येथील जैव-तंत्रज्ञान आणि औषधनिर्माण क्षेत्राकरिता क्षेत्र -सापेक्ष एसईझेडसाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०२४ तयार केले आहेत. हे प्रारूप विनियम आयोगाच्या www.merc.gov.in (https://www.merc.gov.in/regulation_type/draft-regulations/) या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहेत.

४) आयोग याद्वारे वरील प्रारूपावर जनता/संबंधितांकडून सूचना आणि/किंवा हरकती मागवित आहे. ज्या आयोगाच्या (www.mere.gov.in/e-public-consultation) या संकेत स्थळावरील e - public consultation या टॅबव्दारे या सूचनेच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत अपलोड कराव्यात. या टॅबचा वापर करण्यात कोणतीही अडचण आल्यास, संबधित व्यक्ती आयोगाच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवसांमध्ये सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० या दरम्यान मोबाईल क्र.८९२८०७१५२२ वर किंवा suggestions@merc.gov.in या ई -मेल आयडीवर संपर्क साधू शकतात.

५. "E-Public Consultation" टॅबवर सूचना आणि हरकती अपलोड केलेल्या व्यक्तीस त्याच्या निवेदनाची छापील प्रत दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर करणे शक्य नसेल त्यांनी त्यांच्या सूचना आणि हरकतींची छापील प्रत, **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५ यांना संबोधित करून २१ मे, २०२४** रोजी सायंकाळी ५.०० पूर्वी दाखल करावी. अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे दाखल करण्यात आलेल्या सूचना/हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

दि. २१ मे, २०२४ रोजी ५.०० वाजेपर्यंत किंवा त्याआधी अपलोड केलेले किंवा प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती प्रारूप विनियमांना अंतिम स्वरूप देण्यापूर्वी आयोगाकडून विचारात घेण्यात येतील. या विषयावरील पुढील सर्व पत्रव्यवहार आयोगाच्या www.merc.gov.in या संकेत-स्थळाच्या माध्यमातूनच होईल.

**दिनांक: २२ एप्रिल २०२४**
**ठिकाण: मुंबई**

**(डॉ. राजेंद्र गं. आंबेकर)**
**सचिव, मविनिआ**

Size: 8x17 sqcm